Impact Factor – 6.261 | Special Issue - 161 | March 2019 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S
RESEARCH JOURNEY
UGC Approved Journal
Multidisciplinary International E-research Journal

# Education and Opportunities

- GUEST EDITOR -
Prin. Dr. Ishwar M. Saundankar

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

- EXECUTIVE EDITORS -
Mr. Ashish S. Gujarathi
Mr. Anant V. Deshmukh | Mr. Shailesh B. Patil

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

For Details Visit To : www.researchjourney.net

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ▪ Special Issue - 161 ▪ Mar. 2019 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# EDUCATION AND OPPORTUNITIES

... Organized by ...

***Bhagini Mandal Chopda's***

**College of Social Work,**

**Chopda, Dist-Jalgaon.**

... Guest Editor ...

**Principal Dr. Ishwar M.Saundankar**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

... Executive Editors ...

**Mr. Ashish S. Gujarathi | Mr. Anant V. Deshmukh**

**Mr. Shailesh B. Patil**

***Printed by :*** PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

Scanned with CamScanner

८६. 'उच्चशिक्षण आणि उद्योजकता' ........ २२४
प्रा. संध्या एम. पाटील
८७. उद्योजकता विकासात उच्च शिक्षणाचे महत्व ........ २२६
प्रा.अनिता मक्रन खेडकर
८८. भारतातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती व पुढील आव्हाने ........ २२८
प्रा. प्रशांत एन. शंभरकर
८९. उच्च शिक्षणातील समस्या व आव्हाने ........ २३०
प्रा. योगेश एस. मुनेश्वर
९०. ग्रामीण मुलींची शिक्षण सोडण्याची कारणे ........ २३१
प्रा. शामसिंग डी. वळवी
९१. शिक्षणातून व्यक्तिमत्व संवर्धन ........ २३२
प्रा. माया तानाजी शिंदे
९२. समाजकार्य शिक्षण व रोजगाराच्या संधी ........ २३४
प्रा. नारसिंग डोंगरसिंग वळवी
९३. राष्ट्रीय विकासात शिक्षणाचे योगदान आणि शैक्षणिक स्थिती ........ २३६
प्रा. डॉ. नीता सुधाकर वाणी
९४. लोकसमुदाय विकासासाठी शिक्षण एक प्रभावी माध्यम........ २४०
डॉ. जयश्री देशमुख
९५. उच्च शिक्षण – अपेक्षा आणि आव्हाने ........ २४२
प्रा.डॉ.शाम दामू सोनवणे
९६. शिक्षण प्रणाली आणि समाजव्यवस्था........ २४६
प्रा. डॉ. भारती कृष्णराव देशमुख
९७. शिक्षणामध्ये तृतीयपंथीच्या यशोगाथांचा अभ्यास– काळाची गरज ........ २४८
पुर्णिमा ना. संधानी[१], आर.बी.रंधे[२] , वामन कृ. पोकळे[३]
९८. उच्च शिक्षण आणि रोजगारांच्या संधीची उपलब्धता ........ २५२
प्रा.डॉ.संबोधी एम. देशपांडे
९९. उच्च शिक्षण आणि संधी ........ २५३
प्रा. प्रविण एन. वानखडे
१००. शिक्षण आणि संधी........ २५५
प्रा. आशिष सुभाषलाल गुजराथी
१०१. उच्च शिक्षणातील अभ्यासक्रम आणि सामाजिक अपेक्षा........ २५७
प्रा. डॉ. नितीन रामदास बडगुजर

## हिन्दी

१०२. राष्ट्रीय एकता में शिक्षा के अवसर ........ २६०
प्रा. डॉ. प्रविण कांबळे
१०३. उच्च शिक्षा में अनुसंधान का महत्व ........ २६२
प्रा. बालिका कांबळे
१०४. वाणिज्य शिक्षा द्वारा रोजगार निर्मिती संबंधी समस्याएँ........ २६३
प्रा. डॉ. विनायक वाघमारे
१०५. शिक्षा के माध्यम से महिलाओं को राजकीय क्षेत्र में प्राप्त हुई संधी ........ २६५
प्रा. कु. सुनीता दि. श्रीखंडे
१०६. वर्तमान शिक्षा प्रणाली तथा मूल्यशिक्षा........ २६७
प्रा. विशाल चक्रधर गजभिये



Scanned with CamScanner

# 'उच्चशिक्षण आणि उद्योजकता'

प्रा. संध्या एम. पाटील
अ.यु.क.कें. संचलित कला, महिला महाविद्यालय, अनमोल नगर, देवपूर, धुळे.

**प्रस्तावना :**

माणूस म्हणून जगण्यासाठी शिक्षण ही एक मूलभूत गरज असून व्यक्तीला त्याच्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यानुसार शिक्षणाची आवश्यकता असते. या आधारावर शिक्षण व्यवस्थेने घालून दिलेल्या धोरणानुसार प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणांतर्गत पदवी व पदव्युत्तर शिक्षण असे विविध स्तर आहेत. मानवाच्या उत्क्रांतीबरोबरच शिक्षणाची व्याप्ती व आवाका उत्कांत होताना दिसून येतो. दिवसेंदिवस शिक्षणाची व्यापकता व गरज काळानुसार वाढत आहे. प्रत्येक देशातील शिक्षणपध्दतीने भिन्नता आढळून येते. प्रत्येक देश एक शिक्षणपध्दती विकसित करुन त्याद्वारे आपले सामाजिक आणि सांस्कृतिक खास वेगळेपण अभिव्यक्त करतो. त्याबरोबरच काळाच्या आव्हानांना तोंड देतो. यामुळे शिक्षणाला एक नवी दिशा लाभते.

**शिक्षणाचा अर्थ :**

**रुसो :** शिक्षण म्हणजे सवय, कोणत्याही कृत्रिम सवयीच्या आहारी न जाणे, निसर्गानुसार वागणे.

**हर्बट स्पेन्सरच्या मते :** संपूर्ण जीवनाची तयारी म्हणजे शिक्षण होय.

**प्लेटो :** मानवाचे शरीर व आत्मा यांच्यामधील उत्कृष्ठतेचा पूर्णत्वाप्रत विकास म्हणजे शिक्षण होय.

**उच्च शिक्षणाचा अर्थ :**

महाविद्यालयात अगर विद्यापीठात मिळणारे शिक्षण म्हणजे शिक्षण सोपानाची उच्चतम पायरी होय. म्हणून या शिक्षणास उच्चशिक्षण म्हणून संबोधले जाते.

उच्चशिक्षण हे व्यक्तीच्या व समाज घटकाच्या विकासाचे साधन आहे. आपल्या समाजात तर ते सर्वात महत्त्वाचे किंबहुना एकमेव असे साधन आहे.

आधुनिक युगात उच्चशिक्षणात एक नवा प्रवाह निर्माण झाला आहे. तो म्हणजे व्यवसायभिमुख शिक्षणपध्दती होय. राष्ट्रीय विकासात व्यक्तीमत्व विकास एवढया पर्यंत विकास ही संकल्पना मर्यादित नसून उच्चशिक्षणातून मनुष्यबळ कौशल्यक्षम बनविणे ही आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. नवीन ज्ञाननिर्मिती करणे.
२. कौशल्यांच्या माध्यमातून सर्वांगिण विकास साधणे.
३. रोजगारभिमुख शिक्षण.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा वर्णनात्मक असल्यामुळे त्यासाठी ऐतिहासिक संशोधनपध्दतीची व दुय्यम साधनांचा आधार संशोधनासाठी घेतला आहे. संशोधनासाठी संदर्भग्रंथ, पुस्तके, इंटरनेट (महाजाल), वेबसाईट (संकेतस्थळ), कात्रणे इ. वापर करण्यात आला आहे.

जागतिक तुलनेत भारतीय उच्चशिक्षणाचा विचार केला तर नवीन ज्ञान निर्माण करणे हे विद्यापीठाचे उद्दिष्ट असायला हवे. दर्जा, संख्या, सर्वसमावेशकता आणि नावीण्य (क्वालिटी, क्वांटिटी, इनक्लुझिव्हनेस, इनोव्हेशन) यांच्या आधारे ज्ञान वाढते. परंतु सध्या 'मागणीप्रमाणे पुरवठा' या तत्वानुसार पदव्युत्तर आणि पीएच.डी. चे शिक्षण उपलब्ध होत आहे आणि हे अनिष्ट आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे उच्च शिक्षण प्रणालीत कुतुहल आणि नाविन्य (इनोव्हेशन) यांचा अवश्य सहभाग व्हावा. येत्या काळात बदल होण्याची गती प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे इनोव्हेशनला पर्याय नाही.

विद्यापीठीय शिक्षणात मूलभुत बदल होणे गरजेचे आहे. उच्चशिक्षण ही सापेक्ष संकल्पना आहे. रोजगाराभिमुख (व्होकेशनल), व्यावसायिक (प्रोफेशनल) आणि उच्च (अॅडव्हॉन्स) अशी तिची विभागणी होते. आपल्या विद्यापीठामध्ये अभ्यासक्रामत काल सुसंगत बदल करणे हि खूपच जिकरीची व वेळखाऊ प्रक्रिया आहे. त्याला बदल होण्याची गरज आहे. अमेरिकेत दोन भिन्न विद्याशाखेचे शिक्षण एकाला घेता येते. (मल्टी डिसिप्लिनरी अॅप्रोच) ती पध्दती भारतात लागू व्हायला हवी. आज उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचे ज्ञान आणि उद्योगांना लागणारी आवश्यक कौशल्य यात तफावत असते. त्यामुळे या उच्चशिक्षितांना पुन्हा प्रशिक्षण (फिनिशिंग स्कील) द्यावे लागते.

शिक्षणातून नोकरी उद्योजकता वाढीस लागणे हे शिक्षणाचे खरे यश असते. बदलत्या काळात फक्त पारंपारिक शिक्षण हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांचे भावी जीवन सुकर करण्यास उपयोगी पडत नाही. त्यामुळेच कौशल्यावर आधारित शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात केली तर त्याच्या निश्चितच फायदा होतो. विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम पूर्ण करता आला तर त्याचा निश्चितच फायदा विद्यार्थ्यांना नोकरीसाठी व उद्योजक बनण्यासाठी होईल.

कौशल्य आणि ज्ञान हे देशाच्या आर्थिक वाढीची आणि सामाजिक विकासाची प्रेरकशक्ती आहे. भारतासारख्या लोकसंख्येसह वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेत एकीकडे उच्चप्रशिक्षित गुणवत्ता कुशल संसाधनाची कमतरता असून, दुसरीकडे लोकसंख्येचा एक मोठा वर्ग असा आहे की, ज्याच्याकडे थोडी किंवा अजिबातच नोकरीविषयक कौशल्ये नाहीत. शैक्षणिक पात्रतांसह बदलत्या काळाचा सामना करण्यासाठी आणि कठीण तंत्रज्ञानाच्या आव्हानांना तोंड देण्यास सक्षम असलेल्या गतिशील आणि उद्योजक तरुणांना तयार करणे आवश्यक आहे. संभाव्य नियोक्ते उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेसह योग्यता आणि कौशल्ये यांच्याकडे रोजगार क्षमतेच्या दृष्टीकानातून पाहत



Scanned with CamScanner

आहे. याशिवाय उद्योजकांना नवीन लोकांना आवश्यक कौशल्यांनी प्रशिक्षित करण्यासाठी वेळही नाही व त्याच्यात त्यांना रसदेखील नाही. स्पर्धात्मक युगाचा विचार करता इंडस्ट्रिज फक्त कुशल उमेदवारांची नियुक्ती करण्यास तयार आहेत, की जे कंपनीच्या कल्याणासाठी ताबडतोब आपले योगदान देऊ शकतील कोणतेही विशिष्ट कार्य करण्यासाठी कौशल्य एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कौशल्य निर्माणाकडे उत्पादनाची परिणमकारता आणि कामगारांचे त्यातील योगदान सुधारण्याचे एक साधन म्हणून पाहिले जाऊ शकते. कौशल्यनिर्माण हे उत्पादन क्षमता व अर्थव्यवस्थेचा विकासदर वाढविण्यासाठी ते एक महत्त्वपूर्ण घटक आहेत. कौशल्य विकासाकडे व्यक्तीला सक्षम बनविण्यासाठी आणि सामाजिक स्वीकृती आणि मूल्यांत सुधारणा करण्यासाठीचे एक साधन म्हणून पाहिले जाऊ शकते. ज्या देशाकडे उच्च आणि उच्चतम कौशल्ये आहेत ते जागतिकीकरणाची आव्हाने आणि संधीशी प्रभावीपणे जूळवून घेऊ शकतात. भारत हा जगातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी एक असून, भारताकडे जगभरातील विविध अर्थव्यवस्थांना कुशल मनुष्यबळ पुरविण्याची क्षमता आहे. तसेच स्वत:च्या गरजा भागविण्याचीही क्षमता आहे.

भारताला वेगवेगळया आव्हांनाना सामोरे जावे लागणार आहे. त्यामध्ये कौशल्य शिक्षणाला उच्च शिक्षण क्षेत्रात आणण्यासाठीची गतिशिलता, कौशल्य मोहिमेत खाजगी विभागांचा नगण्य सहभाग, निधी आणि अर्थसंकल्पीय वाटप, कौशल्य मान्यता प्रणाली, कुशल शिक्षकांचा अभाव कामगार माहिती व्यवस्थापन प्रणालीने नोकरी देणारे आणि नोकरी करणारे यांच्यातील मध्यस्थ म्हणून काम करणे उच्चशिक्षणात आजीवन शिक्षण व निरंतर शिक्षणाच्या संधी, समाजाचा सहभाग, कौशल्य शिक्षणाचा पारंपारीक शिक्षणाच्या तुलनेत विचार करणे. तसेच असंघटित कामगारांच्या कौशल्यांचा शोध घेणे यांचा समावेश असेल.

**सारांश :**

विद्यार्थ्यांमध्ये योग्य कौशल्ये बाणवायची असतील तर उच्चशिक्षणाच्या संस्थामधून महाविद्यालयामधून सामाजिक गरजेनुसार व्यावसायिक निकषांवर आधारित अभ्यासक्रम, तंत्रविज्ञानाच्या मदतीने शिकविले पाहिजेत. भारतीय शिक्षण व्यवस्थेत मुलांमध्ये उद्योजकीय मानसिकता निर्माण करण्यावर अधिक भर देवून, संस्कारशील नागरीक घडवण्याबरोबरच व्यक्तींचा सर्वांगीण विकास साधता येईल.

**संदर्भ :**

१. महाराष्ट्र टाइम्स, डॉ. व्ही.बी. गायकवाड, १५ मे २०१७.
२. लोकसत्ता, दि. ९ ऑगस्ट २०१३.
३. लोकसत्ता, लोकरंग, दि. १३ ऑक्टो. २०१३.
४. रिसर्च लिंक (आंतरराष्ट्रीय जर्नर) अंक ११०, सं.डॉ. रमेश सोनी.
५. रिसर्च लिंक (आंतरराष्ट्रीय जर्नर) अंक १०८, सं.डॉ. रमेश सोनी.
६. वाघमारे जनार्दन, बदलते शिक्षण स्वरुप आणि समस्या.
७. प्रा. रमेश पानसे, शिक्षण, परिवर्तनाची सामाजिक चळवळ, डायमंड पब्लिकेशन्स पुणे-३० आवृत्ती २००६.



Scanned with CamScanner

SILVER JUBILEE YEAR 2018-19

BHAGINI MANDAL CHOPDA'S

# COLLEGE OF SOCIAL WORK, CHOPDA DIST. JALGAON

## Multidisciplinary One Day International Conference

on

## Education and Opportunities

*Sponsored by*

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# Certificate

This is to certify that Mr./Mrs./Miss/Dr. अनिता मक्कन खेडकर

of पंडीत जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर जि. जळगांव has participated in the One Day Multidisciplinary International Conference on Education and Opportunities Sponsored by Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon and organized by College of Social Work, Chopda. On Saturday 9th March 2019. He/she has presented paper entitled उद्योजकता विकासात उच्च शिक्षणाचे महत्व or participated in the conference.

| Mr. Shailesh Patil | Mr. Ashish S. Gujrathi | Mr. Anant V. Deshmukh | Dr. I.M. Saundankar |
|---|---|---|---|
| Co-coordinator | Co-ordinator | Co-ordinator | Principal |
| International Conference 2019 | | IQAC | |

वर्धमान : 9422733003